ISSN 2394-5303

GOLDEN JUBILEE YEAR

1967-2017

50

१९६७-२०१७

सुवर्ण महोत्सवी वर्ष

Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's

## Shri Vyankatesh Arts, Commerce & Science College

Deulgaon Raja, Dist. Buldana (M.S.), PIN- 443204.

NAAC RE-ACCREDITED AT 'B' LEVEL

Printing Area UGC Jr.No.43053 UGC Approved Refereed Journal

Special Issue, December 2017

Printing Area (TM)

International Multilingual Research Journal

IMPACT FACTOR 4.002 iijif



# Changing Trends & Issues in Indian Politics

(Volume : I)

Chief Editor:

**Dr. Anant Madan Awati**



Scanned with CamScanner

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

December 2017, Special Issue

Shri Balaji Sansthan Deulgaon Raja's

**Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College,**

Deulgaon Raja, Dist. Buldana (M.S.) Pin :443204

NAAC RE-ACCREDITED AT 'B' LEVEL

# Changing Trends & Issues in Indian Politics

(Volume : 1)

Chief Editor:

**Dr. Anant Madan Awati,**

Assistant Professor & Head, Dept. of Political Science,

Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College,

Deulgaon Raja, Dist. Buldana (M.S.) Pin :443204

Moblie : 9421395187/9545195875

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

54)नक्षलवाद आणि हिंसा
प्रा.डॉ. विकास कृष्णराव जुनगरी, जि.यवतमाळ. || 174

55)भारतामध्ये दहशतवादाचा पडलेला प्रभाव
प्रा.डॉ. कल्पना माणिकराव कदम, नांदेड. || 177

56)दहशतवाद : भारतासमोरील आव्हान
डॉ.दिनकर संतुकराव कळंबे, जि.जालना || 180

57)पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद भारताला आव्हान
प्रा.डॉ.गणेश डी. गिरी & डॉ.किशोर सुर्यवंशी, औरंगाबाद || 182

58)दहशतवाद : भारतासमोरील एक आव्हान
प्रा.डॉ. के. जी. पोकळे & प्रा.डॉ. संजय वामनराव भोळे, जि. जळगाव. || 185

59)ईशान्य भारतातील समस्या भारताच्या अंतर्गत सुरक्षेपुढील आव्हान
प्रा.डॉ. एन. झेड. पाटील,ता.जि.धुळे, || 188

60)दहशतवाद : भारतासमोरील आव्हान
प्रा.वसावे अशोक रामसिंग, नाशिक, || 191

61)दहशतवाद — एक समस्या
डॉ. सुनिल पिंपळे, औरंगाबाद || 193

62)जम्मू—काश्मीरमधील दहशतवाद आणि मानवी हक्कांचे उल्लंघन
प्रा.डॉ. रामकिशन वसंतराव लोमटे, जि. औरंगाबाद. || 195

63)भारतातील सामाजिक सुधारणा चळवळीतील समाजसुधारकांचे योगदान
प्रा. डॉ. आर.एन.शेवाळे, जि. जळगांव. || 198

64)दहशतवाद : भारतासमोरील आव्हान
प्रा.डॉ.उमाकांत राठोड, पैठण. || 202

65)दहशतवाद: भारतासमोरील एक आव्हान
डॉ.आर.डी.इंगोले, जि.बुलडाणा || 204

66)दहशतवाद : भारतासमोरील अव्हान
डॉ.सिध्देश्वर सटाले, गेवराई, || 207

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned with CamScanner

माध्यमाद्वारे तोडगा काढताना नेहमीच अडचणींचा सामना करावा लागतो.

**सारांश:**

सारांश रूपाने स्पष्ट करता येईल की, ज्या भारतद्वेषातून पाकिस्तानची निर्मिती झाली त्यालाच पुढे नेण्याच्या भूमिकेवर पाकिस्तान ठाम आहे. पाकिस्तानात राज्यसंस्थेपेक्षा वरचढ झालेल्या अराजकीय संस्थांचा प्रभाव पाकिस्तानच्या सर्व क्षेत्रात मुक्तपणे दिसतो. दहशतवादाचा मार्गात अडथळे आल्यास कधी अमेरिका तर कधी चीन यांच्या मदतीने भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न पाकिस्तान करतो. शिमला कराराच्या पालनाचा फक्त फार्स निर्माण करत पाकिस्तान भारताविरोधी कारवाया करतो. भारतावर दहशतवादी हल्ले होतात यामध्ये सत्यता आहे. पाकिस्तानकडून त्यावर कारवाईचे फक्त आश्वासन भारताला मिळते. पाकिस्तान देखील दहशतवादाच्या छायेखाली आलेले राष्ट्र आहे. म्हणून उभय राष्ट्रातील राजकीय मंडळींनी जास्तीत—जास्त गांर्भियाने यावर चर्चा करून तोडगा काढावा. जेणेकरून सर्वसामान्यांना यातुन नक्कीच दिलासा मिळेल. सांस्कशतिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक देवाणघेवाण यावर लक्ष केंद्रीत करून दोन्ही देशांमधील संबंध सुधारण्यास मदत होईल. दहशतवादाविरूध्द यांची संयुक्त मोहीम असणे आवश्यक वाटते.

**संदर्भ:**


१)पांडा स्नेहलता, आंतकवाद की खोज, वर्ल्ड फोकस, अंक ५०, मे २०१६.

२)देवळाणकर शैलेंद्र, सावध ऐका पुढल्या हाका, लोकमत, १४ डिसेंबर २०१४.

३)देवळाणकर शैलेंद्र, मोदी कालखंडातील भारताचे परराष्ट्रधोरण: सातत्य आणि स्थित्यंतर, द्वितीय आवृत्ती, नोव्हेंबर २०१६, सकाळ प्रकाशन, पुणे .

४) समवाद, कश्मीरमधील आव्हान, महाराष्ट्र टाइम्स, ०७ मे २०१७.


**58**

# दहशतवाद : भारतासमोरील एक आव्हान


**प्रा.डॉ. के. जी. पोकळे,**
संशोधन मार्गदर्शक तथा राज्यशास्त्र विभागप्रमुख , नवगण शिक्षणसंस्था राजुरीचे कला व विज्ञान महाविद्यालय,चौसाळा जि. बीड.

**प्रा.डॉ. संजय वामनराव भोळे,**
अ.र.भा. गरुडमहाविद्यालय, शेंदुर्णी, ता. जामनेर जि. जळगाव.


**********

**प्रस्तावना—**

भारतीय लोकशाही व्यवस्थेमध्ये ज्याप्रमाणे स्वातंत्र्य समता, न्याय, बंधुता या तत्वांना महत्वाचे स्थान आहे. त्याबरोबरच स्वातंत्र्य संकल्पना अत्यंत महत्वाची आहे. सर्वसामान्य लोकांना आपला सर्वांगीण विकास करून घेण्यासाठी आवश्यक परिस्थिती म्हणजे स्वातंत्र्य होय. या स्वातंत्र्याचा फायदासर्वच घटकातील लोकांना होणे हिकाळाची गरज आहे. परंतु २० व्या शतकात दहशतवादाने जागतिक पातळीवर ज्याप्रमाणे थैमान घातले आहे. त्याच प्रमाणे भारतामध्ये सुद्धा या दहशतवादी पद्धतीने मानवी स्वातंत्र्य धोक्यात आणून भारतीय लोकशाही व्यवस्थेला अडचणीत आणण्याचे काम केले आहे.

जगभरात विविध दहशतवादी संघटना आपले वर्चस्वनिर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. आणि त्याच संघटना भारतामध्ये सुद्धा आपले अस्तित्व निर्माण करून निश्चित ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहेत. १९९० च्या दशकात अफगाणिस्थान या देशात तालिबान हि दहशतवादी संघटना निर्माण होऊन सत्तेवर आली, या बरोबरच अलकायदा, जैश—ए. मोहम्मद, आय एस आय निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. व त्याचा



Scanned with CamScanner

परिणाम म्हणून भारतीय लोकशाही व्यवस्था धोक्यात येऊन मानवी स्वातंत्र्याची हानी होताना दिसत आहे. खऱ्या अर्थाने आज जागतिक पातळीवर आंतरराष्ट्रवादाची संकल्पना निर्माण होऊन जागतिक शांतता व त्यामाध्यमातून जगाचा विकास होणे गरजेचे असतांना आज भारतात भयभीत वातावरण निर्माण होऊन दहशत वादाचा नायनाट करण्यासाठी भारतातील राजकीय व्यवस्था आपले पाऊले उचलत आहे. तेव्हा अशा वेळी लोककल्याणाची कार्य मात्र भारतीय लोकशाही शासनाकडून होतांना दिसत नाहीत. ही भारताच्या महासत्तेच्या दृष्टीने खूप मोठी समस्या आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे–**

प्रस्तुत शोध निबंध सादर करतांना त्याची काही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून दशतवाद: भारतासमोरील एक समस्या व आव्हान या अनुषंगाने प्रस्तुत शोध निबंधाने लेखन करण्यात आलेआहे.

१.जगतिक पातळीवरील दहशतवादाचे स्वरूप स्पष्ट करणे.

२.दहशतवादाचा प्रमुख उद्देश स्पष्ट करणे.

३.दहशतवादाचा भारतामधील प्रवेश व सद्य:स्थिती याचा आढावा घेणे.

४.भारतीय लोकशाहीसाठी दहशतवाद हा धोका ठरत आहे याचा आढावा घेणे.

५.दहशतवाद आणि त्याच्या माध्यमातून मानवी स्वातंत्र्याचे होणारे नुकसान याचा आढावा घेणे.

**व्याख्या—दहशतवाद**

१.'युनो(९२)वे कलम " एखाद्या विशिष्ठ प्रश्नांच्या संदर्भात दहशत निर्माण करण्यासाठी केलेला वेकायदेशीर हिंसाचार म्हणजे दशतवाद होय.

आपले विशिष्ठ ध्येय समोर ठेवून ते साध्य करण्यासाठी केवळ दहशती साधनांचा वापरकरणे हे दहशतवादाचे प्रमुख कार्य असते. भारतामध्ये २०१७ पर्यंत ८०० च्या आसपास दहशतवादी घटना घडल्याचे अनेक दाखले आहेत.

**दहशतवादाचा भारतीय लोकशाही वरील परिणाम**

**१.मानवी स्वातंत्र्याची गळचेपी:**

भारतामध्ये स्वातंत्र्यानंतर कल्याणकारी विचारधारा स्वीकारून जास्तीत जास्त लोकांचे कल्याण करणे व त्यांना आवश्यक असे स्वातंत्र्य देणे यास अधिक महत्वाचे स्थान देण्यात आले. परंतु स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतर ही भारतातील सर्वसामान्य जनतेला आपल्या स्वातंत्र्याचा खरा उपभोग घेता येत नाही. कारण दहशतवादी संघटना आपले विशिष्ट ध्येय साध्य करण्यासाठी बॉम्बस्फोट घडवून आणतात, विमानाचे अपहरण करतात. काहींना ओलीस ठेवतात. यामुळे व्यक्तींना भयभीत वातावरणात राहून आपल्या खऱ्या स्वातंत्र्यापासून वंचित राहावे लागते.

**२.मानवी जीविताची हानी–**

दहशतवादी संघटना केवळ दहशतच निर्माण करत नाहीत तर मानवी संहार घडवून अनेकांचे प्राण घेतात याची अनेक उदाहरणे आहेत. १९९६ मध्ये आसाममध्ये १०७ लोकांना या कृत्यामुळे आपले प्राण गमवावे लागले, तर महाराष्ट्रामध्ये सुद्धा मुंबई बॉम्ब हल्यामध्ये अनेक निष्पाप लोक मारले गेले.

भारतातील जम्मू–काश्मीर मध्ये सन १९८९ पासून ९० हजार लोक दहशतवादी हिंसाचारामध्ये मारले गेले आहेत. अशा अनेक घटना आज भारतामध्ये घडतात व त्याचा परिणाम मानवी जीवित हानी मध्ये होतो.

**३.राजकीय व्यवस्थेसमोर आव्हाने–**

भारता समोर दहशतवाद हे एक मोठे आव्हान झाले आहे कारण भारताने दुसऱ्या महायुद्धानंतर अलीप्तवादाचा स्वीकार केला त्याच बरोबर पंचशील तत्वांचा स्वीकार करून जागतिक शांततेला महत्वाचे स्थान दिले. परंतु अशी परिस्थिती आता न राहिल्यामुळे अनेक वेळा या तत्वांना बाजूला ठेवून १९६५,१९७१,१९९९ या काळात दहशतवादाच्या समस्यासाठी भारताला युद्ध करावे लागले. यामध्ये अनेक भारतीय जवानांना प्राण गमवावे लागले. व याचा परिणाम भारतीय लोकशाही राजकीय व्यवस्थेवर होऊन सर्वसामान्य जनतेचा भारतीय लोकशाही व्यवस्थे वरील विश्वास कमी होत आहे. हि भारताच्या भविष्यकालीन विकासाच्या दृष्टीने एक गंभीर समस्या झाली आहे.

**४.जागतिक शांततेला धोका**

आज खऱ्या अर्थाने जागतिक शांतता निर्माण होणे हि काळाची गरज झाली आहे. अशा परिस्थितीत भारताला इतर विकासाचे प्रश्न बाजूला ठेवून जागतिक



Scanned with CamScanner

शांतेच्या दृष्टीने आवश्यक प्रयत्न करावे लागत आहेत. अनेक देशांशी आजपर्यंत केलेले करार निष्फळ ठरत आहेत. उदा. १९६६ ताश्कंद करार, १९७२ शिमला करार, १९९९ भारत पाकिस्तान समझोता करार. हे सर्व करार आज दहशतवादी कृत्यांमुळे नष्ट होऊन राष्ट्राराष्ट्रामध्ये संघर्षमय वातावरण निर्माण होत आहे. या दृष्टीने आज दहशतवादाचा विचार करणे गरजेचे झाले आहे.

**५.भारताच्या महासत्तेसाठी अडथळा—**

२०२० साली भारत महासत्ता होईल अशी भाकिते भारतातील राजकारणी, समाजसेवक व राजकीय विचारवंत करत आहेत. परंतु आज दहशतवादाचे भयानक स्वरूप बघितले तर भारतापुढे हि एक मोठी गंभीर समस्या झालेली दिसत आहे.

टाज समाज कारण, राजकारण, अर्थकारण, धार्मिक घटक या सर्व स्तरामध्ये दहशत वादाचे थैमान दिसत असल्यामुळे एकीकडे गरिबी, दारिद्रय, उपासमार या समस्या आणि दुसरीकडे दहशतवादी राक्षस अशा कचाटयामध्ये भारताची लोकशाही व्यवस्था वाटचाल करत आहे. तेव्हा भारताच्या महासत्तेची स्वप्ने केवळ मश्गजळा प्रमाणे ठरतात कि काय असे वाटू लागले आहे.

**दहशतवाद रोखण्यासाठी उपाय—**

१.भारतातील आर्थिक विषमतेची दरी शासकीय धोरणाच्या माध्यमातून कमी करणे.

२.राजकीय भ्रष्टाचार थांबविणे.

३.राज्याराज्यात वाढणारी धर्मांधता व स्वार्थी प्रवृतीला पायबंद घालणे.

४.राष्ट्रीय एकात्मता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.

५.धर्मनिरपेक्ष लोकशाही निर्माण करणे

६.मनव अधिकाराचे रक्षण करणे.

७.स्मतोल मानवी विकास करणे.

**सारांश—**

एकंदरीतच भारताच्या विकासाच्या व भविष्य कालीन परिस्थितीच्या दृष्टीने विचार करता भारतापुढे दहशतवाद हि एक गंभीर समस्या निर्माण झालेली दिसते. असे असले तरी आज भारत हा देश विकासाच्या वाटेवर आहे. आणि दहशतवादाला रोखण्यासाठी बऱ्याच प्रमाणात भारताने आपली समर्थता निर्माण केलेली दिसते. परंतु २०२० साली भारत महासत्ता होणार अशी सर्वत्र चर्चा असतांना मात्र दहशतवादाचा पूर्ण पणे नायनाट करणे हि भारताची खरी गरज आहे. त्या दृष्टीने भारताच्या सामाजिक, राजकीय पातळीवर कसोसीने प्रयत्न होणे महत्वाचे आहे. अन्यथा अनेक वर्षांच्या अथक प्रयत्नातून भारताला मिळालेले स्वातंत्र्य हे केवळ मृगजळा प्रमाणेच राहील हे वरील संशोधन लेखनातून स्पष्ट होते.

**संदर्भ—**


१.डॉ. शैलेंद्र देवळाणकर, समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख प्रश्न,विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

२.डॉ. पंडित नलावडे (संपादक) भारता पुढील आव्हाने आणि सद्यस्थिती, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, प्रथम आवश्ती जाने.२०१५.

३.डॉ. एस. एम. वाघ (संपादक) 'भारत' शेजारील राष्ट्रे आणि परराष्ट्र धोरण.अथर्व पब्लिकेशन धुळे, प्रथम आवृत्ती ६ जाने. २०१७


४.डॉ. शैलेंद्र देवळाणकर, भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थीत्यंतर,प्रतिमा प्रकाशन, पुणे २०१०.


❑❑❑



Scanned with CamScanner






www.vidyawarta.com




₹ ३००/-

ISSN 2394-5303

*Publisher & Owner*
Archana Rajendra Ghodke
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
(Maharashtra) Mob.09850203295
E-mail: vidyawarta@gmail.com
www.vidyawarta.com

Scanned with CamScanner